# नानिका हसन हत्याप्रकरणातील पाच आरोपींना जन्मठेप

## जाफरजीन येथील घटना

## पाच वर्षांत जिल्हा न्यायालयाचा निर्णय



हत्याकांडाचे घटनास्थळ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** 2019 मध्ये शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जाफरजीन प्लॉटमध्ये नानिका हसन नावाच्या इसमाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी शनिवारी 21 डिसेंबर रोजी पाच वर्षानंतर अमरावती जिल्हा न्यायालयाने निकाल देत पाच आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. शिक्षा झालेल्या आरोपींमध्ये शेख इरफान शेख अयुब, शेख वसीम शेख गफ्फार, शेख शाहरुख शेख सलीम, शेख रिजवान उर्फ ??गोलू शेख अयुब आणि शेख सलमान शेख सलीम यांचा समावेश आहे. ही घटना 25 नोव्हेंबर 2019 रोजी घडली.

विधी सुत्रानुसार, 25 नोव्हेंबर 2019 रोजी दुपारी 2 वाजता नानिका हसन व त्यांचा मित्र सुभाष खुरखुरियासोबत कोर्टाची तारीख संपवून घरी परतत होते. दरम्यान जाफरजीन प्लॉटच्या दर्ग्याजवळ हल्लेखोर हे ऑटोतून त्याचा पाठलाग करत होते. त्यानंतर हल्लेखोरांनी हसन यांच्या ऑटोसमोर आपला ऑटो उभा करून, त्याच्यावर धारदार शस्त्रे आणि चाकूने वार केले. अतिरक्तस्त्रावामुळे नानिका हसनचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी 8 आरोपींना अटक केली होती.

### एका आरोपीचा झाला होता मृत्यू

सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे 18 साक्षीदार तपासण्यात आले. यापैकी एक पंच आणि दोन साक्षीदार फितुर झाले. यातील एक आरोपी सय्यद फैजान उर्फ 'सोनू उर्फ ' छोटा रिचार्ज याचा सुनावणी दरम्यान मृत्यू झाला. न्यायालयाने अन्य आरोपी शेख आबिद शेख अजीम, नौशाद शाह, मुस्ताक शाह यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. सरकारच्या वतीने सहायक सरकारी अधिवक्ता एड. दिलीप तिवारी यांनी यशस्वीपणे बाजू मांडली.

### 150 पानांचे होते आरोपपत्र

नानीका हसन खून प्रकरणाचा सखोल तपास तत्कालीन सिटी कोतवाली पोलिस स्टेशनचे पीएसआय गजानन राजमलू यांनी केला होता. ठाणेदार शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे दीडशे पानांचे आरोपपत्र तयार करण्यात आले. खून प्रकरणातील प्रत्येक पैलू लक्षात घेऊन अधिकाधिक पुरावे व प्रत्यक्षदर्शी साक्षी गोळा करण्यात आले. ज्याच्या आधारे आरोपींना शिक्षा झाली.

# चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ऑनलाइन परीक्षेत घोळ!




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील रिक्त असलेल्या लिपिक, तसेच शिपाई पदांसाठी ऑनलाईन परीक्षांचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. शहरातील विभागीय क्रिडा संकुल परिसरात प्रोबीटी इन्फोटेक येथील केंद्रावर ही परीक्षा सुरु होती. परंतु सकाळी 10 वाजताच्या पहिल्याच शिफ्टदरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाईन टिक केलेले उत्तर हे काही वेळाने बदलत असल्याचे लक्षात आले. यावेळी पोलिसांनाही या केंद्रावर बोलविण्यात आले होते. त्यानंतर ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोंधळाची माहिती मिळताच प्रहार जनशक्ती पक्षाने देखील परीक्षा रद्द करण्याची मागणी निवेदनातून केली आहे. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथील 261 लिपिक तर 97 शिपाई पदाकरिता 7 ऑक्टोबर 2024 रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या पदासाठी राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यामुळे 21, 22 व 23 डिसेंबर रोजी या पदांसाठी राज्यभरातील 37 केंद्रावर ऑनलाइन परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षा दिल्ली येथील एका आयआयटी कंपनी मार्फत घेण्यात आल्या. शहरातील विभागीय क्रिडा संकुल परिसरात प्रोबीटी इन्फोटेक येथील केंद्रावर ही परीक्षेचे आयोजन केले होते. परंतु पहिल्याच शिफ्टला गोंधळ उडाला काही विद्यार्थ्यांचे उत्तर हे सबमिट होत नसल्याचे तसेच काहींचे उत्तरे अचानक चेंज होत असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनी गोंधळ करताच आयआयटी कंपनीने परीक्षा रद्द करून सदर परीक्षा 23 डिसेंबरला घेणार असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. यामुळे काही विद्यार्थ्यांनी प्रहारच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन या परीक्षेतील घोळाची चौकशी करण्याची मागणी केली. महानगराध्यक्ष बंटी रामटेके, छगन चव्हाण, रोशन गवई, कुणाल खंडारे उपस्थित होते.

# हरिद्वारमध्ये ऑनलाइन रूम बुकिंगच्या नावाखाली फसवणूक

## महिलेची गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** हरिद्वारमध्ये आयोजित पतंजली शिबिरात सहभागी होण्यासाठी ऑनलाइन रूम बुकीच्या नावावर फसवणूक करण्यात आली. ही घटना 20 डिसेंबर रोजी उघडकीस आली. महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आचार्य उपेंद्र पांडे (हरिद्वार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कठोरा नाका परिसरातील राहणाऱ्या या महिलेला हरिद्वार कॅम्पला जायचे होते. त्यामुळे त्याने पतंजलीच्या वेबसाइटवर ऑनलाइन जाऊन त्या नंबरवर कॉल केला. हरिद्वारमध्ये एक खोली बुक करण्यासाठी अज्ञात आरोपींनी त्यांना सांगितले की दोन लोकांसाठी 14,600 रुपये लागतील. ज्यामध्ये राहण्याची, जेवणाची आणि खोलीची व्यवस्था होती. खोली बुक करण्यासाठी महिलेच्या पतीने आरोपीच्या फोन नंबरवर 14,600 रुपये पाठवले. यासोबतच पतीचा मित्र अविनाश पाटील याने 14 हजार 900 रुपये आणि गोपाळ मालपे याने 14 हजार 600 रुपये फोनवरून पाठवले. मात्र 5 जून 2024 रोजी ते सर्वजण हरिद्वारला गेले असता आरोपीने वारंवार फोन करून रक्तगट चाचणीसाठी पैसे मागितले. त्यानंतर अविनाश पाटील याने 11 हजार 280 रुपये तर गोपाळ मालपे याने 10 हजार 220 रुपये फोन पे पाठवले. सर्व लोक हरिद्वार पतंजली योग केंद्रात पोहोचल्यानंतर चौकशी केली असता, आरोपींनी दिलेली कागदपत्रे खोटी असल्याचे उघड झाले. आरोपीने फोन केला असता त्याचा मोबाईलही बंद होता. आरोपी आचार्य उपेंद्र पांडे यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात महिला व तिच्या साथीदारांची एकूण 65 हजार 600 रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी कलम 66 (डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पांढरी येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग


**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी, ( दि.21 )-** तालुक्यातील पांढरी येथील सैय्यद सोजेब सैय्यद रफिक या युवकाने दि.20 रोजी आपल्या घराजवळीलच शाळकरी अल्पवयीन 16 वर्षीय मुलीचा हात पकडुन विनयभंग केला. अंजनगाव पोलिसांनी याप्रकरणी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. पिडीता ही शाळेत जात असतांना आरोपी हा दररोज फिच्या मुलीचा पाठलाग करत असतो. दि.20 रोजी सकाळी 11 वाजता अल्पवयीन मुलगी ही तिच्या घरासमोर उभी असता आरोपी सै.सोजेब याने अल्पवयीन मुलीचा हात पकडुन तुला मारुन टाकीन, नाही तर मी माझा जिवाचे बरे वाइट करुन टाकेल व तुझी गावात बदनामी करुन टाकीन अशी धमकी दिली. अल्पवयीन मुलीने आरोपीचा हात झटकुन घाबरत घरात आली. मुलीने झालेली आपबीती आईस कथन केल्यावर मुलीच्या आईने मुलीसह अंजनगांव सुर्जी पोलीस स्टेशन गाठुन आरोपी विरुध्द तक्रार दाखल केला. फिर्यादीच्या तक्रारी वरुन सैय्यद सोजेब सैय्यद रफिक (वय 21, रा.पांढरी खानमपुर) यास कलम75(2),78(2), 351(2)बिएनएस सहकलम 12 पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल करुण अटक करण्यात आली.आरोपी सै.सोजेब यास काल दि.21 रोजी सत्र न्यायालय अचलपुर येथे हजर आले असता ,प्रकरणात आरोपीस न्यायालया मार्फत चौदा दिवसाच्या न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले असुन पुढील तपास ठाणेदार प्रकाश अहीरे यांचे मार्गदर्शनात करीत आहेत.

# अटल दौड हाफ मॅरेथॉन मध्ये 3000 धावकांची नोंदणी

**अमरावती**-राज्यस्तरीय अटल दौड अमरावती हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये आतापर्यंत 3000 धावकांनी नोंदणी केली आहे. 25 डिसेंबर रोजी अमरावती येथील दसरा मैदानातून ही स्पर्धा सुरू होणार आहे. तुषार भारतीय मित्र मंडळाद्वारे स्वर्गीय प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मृती प्रित्यर्थ अटल दौड हाफ मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. वेगवेगळ्या तेरा गटात होणाऱ्या या स्पर्धेसाठी आतापर्यंत 3000 धावकांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत सहा लाख रुपयांचे रोख पुरस्कार आणि हाफ मॅरेथॉन मध्ये पुरुष आणि महिला विजेत्यांना दुचाकी आणि मोपेड वाहन पुरस्कार म्हणून दिले जाणार आहे. या स्पर्धेच्या टी-शर्ट चे विमोचन आयोजक तुषार भारतीय, अथलेटिक असोसिएशनच्या सचिव अतुल पाटील, प्रशांत शेगोकार, लता जोशी, प्रदीप सोळंके, विनोद भोजवानी, संतोष पिढेकर आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

# हरिसाल ते चौराकुंड मार्गावर वनराजाचे दर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी, ( दि.21 ) -** तालुक्यातील हरिसाल ते चौराकुंड मार्गावर उन्मुक्तपणे पट्टेदार वाघ फिरत असताना प्रवाशांनी व व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (ता. 20) दुपारी प्रत्यक्ष पाहिले.

त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली असली तरी पर्यावरण प्रेमी मात्र आनंद व्यक्त करीत आहेत. धारणीपासून 30 किलोमीटर अंतरावर हरिसालच्या जंगलात 19 डिसेंबर रोजी दुपारी अनेकांना वाघाचे दर्शन झाले. पर्यटक व वाहनांवर फिरणाऱ्यांनी आनंदाचा अविस्मरणीय क्षण अनुभवला. मात्र, शेतात रात्री मुक्काम करणार्या व रात्री-अपरात्री फिरणाऱ्या ग्रामस्थांमध्ये मात्र दहशत पसरली आहे. मागीलवर्षी हरिसाल गावशिवारात या वाघाने धुमाकूळ घातला होता. यावेळी मात्र हा वाघ शांतपणे फिरत होता. अनेक प्रवाशांनी उघड्या डोळ्यांनी या वाघाचे दर्शन घेतले व त्याला अगदी जवळून कॅमेऱ्यात कैद देखिल केले. तर काहींनी या वाघोबाचे चक्क व्हीडिओ देखिल काढले. एका माहितीनुसार, मध्य प्रदेशातून सातपुडा-मेळघाट कॉरिडोरच्या जंगलातून चौराकुंड वनपरिक्षेत्रात प्रवेश करून हरिसाल रेंजमध्ये दोन वर्षांपूर्वी आलेली वाघीण असल्याची खात्री आहे.

गुगामल वन्यजीव विभागातील हरिसालचे रेंजर गिरीश जतकर आणि सिपना वन्यजीव विभागातील चौरकुंडचे वन परिक्षेत्राधिकारी खेरडे यांनी वाघिणीच्या मुक्त संचाराच्या घटनेला दुजोरा दिला आहे. हरिसाल ते खोमरा, चौपन, वनमालुर, चौराकुंड तथा तांगडा मार्गाद्वारे ये-जा करणाऱ्यांना धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हरीसाल रेंजच्या चिचापाटी गावाच्या रस्त्यावर जंगलातील भाडादा मेळघाटची पाहुणी वाघीण अनेकदा दिसली आहे. सध्या कोणावरही आक्रमण मात्र या वाघिणीने केले नाही.

# हिवाळी अधिवेशनातून मोर्शी-वरुड विधानसभेला मिळाला भोपळा

**विलास पाटील**

**वरुड, ( दि.21 )-**हिवाळी अधिवेशनात पुन्हा एकदा मोर्शी विधानसभा मतदारसंघाला भोपाळा मिळाला आहे.हिवाळी अधिवेशन म्हटले की विदर्भातील लोकांना काहीतरी मिळेल ही आशा असते. या अधिवेशनात विविध प्रश्न मार्गी लावल्या जातात त्यातील एक भाग म्हणून वरुड, मोर्शी विधानसभेमध्ये रखडलेला संत्रा प्रक्रिया प्रकल्प, तत्कालीन कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी मायवाडी येथे संत्रा प्रक्रिया प्रकल्पाची मूहुर्तमेढ रोवली होती. त्यामुळे या मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. परंतु तेव्हापासून तर आजपर्यंत या मतदारसंघातील प्रत्येक आमदारांनी संत्रा प्रक्रिया प्रकल्पासाठी विधानसभेमध्ये आवाज उठविला. एवढेच नाहीतर डॉ.अनिल बोंडे यांनी सुद्धा हर्षवर्धन देशमुखांप्रमाणेच मोर्शी तालुक्यातील ठाणाठुणी येथे तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करून घेतले होते. तेव्हा शेतकऱ्यांना वाटले होते की, आता संत्रा प्रक्रिया प्रकल्प होणारच, परंतु मागील दहा वर्षापासून भूमिपूजन केल्यानंतर एक वीट सुद्धा त्या ठिकाणी लावण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे, त्यानंतर 2019 मध्ये देवेंद्र भुयार या भागाचे आमदार झाले. त्यांनी सुद्धा संत्रा प्रक्रिया प्रकल्पासाठी अधिवेशनामध्ये आवाज उठविला होता. आता तरी संत्रा प्रक्रिया प्रकल्प शेतकऱ्यांसाठी निर्माण होईल अशी आशा होती, परंतु तेव्हाही निराशा झाली. त्यानंतर 2024 च्या निवडणुका लागल्या आणि भारतीय जनता पार्टीचे चंदू यावलकर हे आमदार झाले, त्यांनी सुद्धा या हिवाळी अधिवेशनामध्ये संत्रा प्रक्रिया प्रकल्पाचा मुद्दा उचलून धरला असला तरी तो प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी अधिक किती आमदारांना या मतदारसंघांमध्ये जन्म घ्यावा लागेल असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केल्या जात आहे.

## संत्रा प्रक्रिया प्रकल्प नित्याचाच विषय



मोर्शी विधानसभा मतदारसंघात सर्वात जास्त संत्रा उत्पादक शेतकरी आहे. आणि म्हणूनच संत्रा प्रक्रिया प्रकल्प शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा समजल्या जातो. या मतदारसंघातील प्रत्येक शेतकऱ्यांकडे संत्राच्या बागा आहेत. त्यामुळे या मतदारसंघातील शेतकऱ्यांना संत्रा प्रक्रिया प्रकल्पाशिवाय पर्याय नाही. हा प्रकल्प झाला तर संत्र्याला राजाश्रय मिळाल्याशिवाय राहणार नाही, परंतु संत्रा प्रक्रिया प्रकल्प होण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती नसल्यामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. मात्र वरुड तालुक्यातील एमकेसी या कंपनीने खाजगी तत्त्वावर संत्रा प्रकल्प सुरू केला असून तो प्रकल्प लवकरच पूर्णत्वास जाईल व शेतकऱ्यांना त्याचा पुरेपूर फायदा झाल्याशिवाय राहणार नाही, असे आता परिसरातील शेतकरी बोलू लागले आहे. असेच प्रकल्प खाजगी तत्त्वावर का असेना शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्माण व्हावे अशी अपेक्षा या निमित्याने शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# दिवसाढवळ्या बेडरूममधून 49 ग्रॅम सोन्याचे दागिने चोरले

## आदिवासी नगरातील घटना, संशयावरून महिलेवर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 ) -** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आदिवासी नगर येथे भरदिवसा घरातील बेडरुममधून एकूण 2 लाख 80 हजार रुपये किमतीचे 49 ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना 20 डिसेंबर रोजी घडली. तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी संशयाच्या आधारे महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सूत्रांनुसार, तक्रारदार महिलेचे आदिवासी नगर येथे दोन वर्षांपूर्वी लग्न झाले होते. महिलेच्या पालकांनी तिला सोन्याचे दागिने दिले होते. 20 डिसेंबर रोजी मामाच्या मुलीची एंगेजमेंट असल्याने ती चांगापूरला जात होती. त्यामुळे तिने दागिने काढून बेडरूममध्ये बेडवर ठेवले आणि शेजारी राहणाऱ्या महिलेला साडी नेसायला घरी बोलाविले. त्यानंतर ती महिलाही खाली आली आणि निघून गेली. तक्रारदार महिला बेडरूममध्ये गेली असता तिला दागिन्यांची पेटी दिसली नाही. दागिन्यांमध्ये 1 लाख 10 हजार रुपये किमतीचे 20 ग्रॅमचे मंगळसूत्र, 96 हजार 600 रुपये किमतीचे छोटे मंगळसूत्र, 70 हजार रुपये किमतीचे 11.5 ग्रॅमचे दोन कानातले, 10 हजार रुपये किमतीचे 2 ग्रॅम किमतीचे सोन्याचे नाकातील अंगठी, 0.5 ग्रॅम किमतीचे बेसर, 0.5 ग्रॅम असे एकूण 949 रुपये असा एकुण 2 लाख 80 हजार रुपयांचा माल चोरीला गेला. संशयाच्या आधारे महिलेची चौकशी केली असता तिने काहीही सांगितले नाही. तक्रारदार महिलेला शेजारच्या महिलेवर संशय आहे. पोलिसांनी संशयाच्या आधारे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४